# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०७/०७/२०१८**

## १) मो. सा. चोरी :-

**विमानतळ :-** दिनांक २९.०५.२०१८ चे १२.०० वा. चे सुमारास बाबानगर नांदेड येथे यातील फिर्यादीची ॲक्टीव्हा कंपनीची स्कुटी क्रमांक एम. एच.२६/ए. पी. ७८५१ अंदाजे किंमत २०,०००/- रुपयाची नमुद ठिकाणी लावली असता कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी बालाजी विठ्ठलराव खंडारे, वय ४५ वर्षे व्यवसाय खाजगी नौकरी बाबानगर नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. विमानतळ** गुरनं १६८/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/पठाण, मो.क्रं. ०२४६२-२२११००** हे करीत आहेत.

## २) आत्महत्येस प्रवृत करणे :-

**तामसा :-** सन २००३ ते मे २०१८ रोजी मयताचे सासर उमरी मंडळ मुधोळ जि. आदिलाबाद येथे यातील आरोपीतांनी संगणमत करुन **मयत नामे सौ. शिल्पा भ्र. नागोराव चव्हाण, वय ३१ वर्षे घरकाम रा. उमरी मंडळ मुधोळ जि. अदिलाबाद** हीचे चारीत्र्यावर संशय घेवुन नवीन ॲटो विकत घेण्या करिता ५०,०००/-रुपयाची मागणी केली परंतु फिर्यादीचे कुटूंब यानी पैसे न दिल्याने आरोपीतांनी फिर्यादीचे मुलीला अनेक वेळा शिवीगाळ करुन मारहाण केली व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. सासरच्या लोकांचया छळाला कंठाळुन दि. ०२.०७.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ते १४.३० वाजताचे दरम्यान घरातील देवघरातील छताचे लाकडी अँगलला ओढणीने बांधुन गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैर **फिर्यादी सौ. सुरेखा दत्तराम पुयड, वय ५० वर्षे व्यवसाय घरकाम रा. वायफना बु ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. तामसा** गुरनं. ५८/२०१८ कलम ३०६, ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४, भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/ सुनिल माने, मो.क्र. ८७८८०१४०२०** हे करीत आहेत.

## ३) विवाहितेचा छळ :-

**अ) शिवाजीनगर :-** दिनांक २४.०५.२०१२ ते २७.०४.२०१८ पावेतो निळा ह. मु. शिवाजीनगर नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी महिलेस माहेरहुन ३ लाख रुपये घेवुन ये असे म्हणुन शारीरीक व मानसिक त्रास देवुन सतत मारहाण करुन अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन आरोपीतांनी मारहान केल्यामुळे फिर्यादीचे गर्भपिशवी जवळ रक्ताच्या गाठी तयार झाल्या त्यावर आरोपीतांनी उपचार न करता तिला माहेरी पाठवुन दिले व तुझ्या माहेरहुन पैशाची व्यवस्था झाली नाही तर तुला जीवे मारुन टाकतो अशी धमकी दिली तसेच शिवीगाळ केली. वगैरे मा. कोर्टाचे १५६(३) सीआरपीसी प्रमाणे गुन्हा दाखल. **२२ वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. शिवाजीनगर** गुरनं. १५६/२०१८ कलम ४९८(अ), २९४, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२०५९ सानप, मो.क्र. ९४२१८४९९८९** हे करीत आहेत.

**ब) नांदेड ग्रामीण :-** दिनांक २०१५ पासुन ते डिसेंबर २०१७ पर्यंत सतत वेळोवेळी फिर्यादीचे सासर घर पदमवार हॉस्पीटल जवळ सिडको नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी फिर्यादीस तुझ्या माहेरहुन कपडयाचे दुकान टाकण्यासाठी एक लाख रुपये घेवुन ये म्हणुन तगादा लावुन फिर्यादीस मारहाण व शिवीगाळ करुन तिचा शारीरीक व माणसीक छळ केला. **२५ वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं. २९७/२०१८ कलम ४९८(अ), ३२३, ५०४,भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/१८५४ पंडीत, मो.क्र. ९७६७०१७७११** हे करीत आहेत.

## ४) पळवून नेले :-

**उमरी :-** दिनांक ०२.०७.२०१८ रोजी ०९.०० ते १८.०० वा.चे दरम्यान दासगणुनगर उमरी, जि. नांदेड येथे यातील **फिर्यादी बाईचा मुलगा नामे शशीकांत पि. चंद्रकांत शेळके, वय १० वर्षे रा. दासगणुनगर उमरी जि. नांदेड** हा शाळेत जातो म्हणुन गेला असता तो परत घरी आला नसल्याने नातेवाईकाकडे शोध घेतला असता मिळुण आला नाही त्यास कुणीतरी अज्ञात आरोपीने आज्ञात कारणावरुन पळवून नेले. वगैरे **फिर्यादी सौ. वर्षा चंद्रकांत देवके, रा. दासगणुनगर उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. उमरी** गुरनं ११३/२०१८ कलम ३६३ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/एस. एम. सुर्वे, मो. नं. ८६०५५५४०००** हे करीत आहेत.

## ५) कल्याण नावाचा मटका खेळत असतांना मिळुण आले :-

**अ)वजिराबाद :-** दिनांक ०६.०७.२०१८ रोजी चे १७.०० वा. चे सुमारास हिंगोली गेट येथील खुराना ट्रॅव्हल्सच्या बाजुला मोकळया जागेत नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या स्वतःचे फायदयासाठी कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना ५,०८०/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/किरण सुरेश पठारे, ने.पो.स्टे. वजिराबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. वजिराबाद** गुरन. १७४/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/१७५२ हणमंत पोतदार , मो.क्र. ७३५०७८१७३४** हे करीत आहेत.

**ब)वजिराबाद :-** दिनांक ०६.०७.२०१८ रोजी चे १७.५० वा. चे सुमारास मिलगेट येरीया नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या स्वतःचे फायदयासाठी कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना ५,१६०/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/किरण सुरेश पठारे, ने.पो.स्टे. वजिराबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. वजिराबाद** गुरन. १७५/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२०८ बालाजी कौठेकर, मो.क्र. ०२४६२-२३६५८०** हे करीत आहेत.

## ६) मिलन डे नावाचा मटका खेळत असतांना मिळुण आले :-

**इतवारा :-** दिनांक ०६.०७.२०१८ रोजी चे १५.३० वा. चे सुमारास पॉपुलर कॅरम क्लब चे बाजुला मोकळया जागेत इतवारा नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या स्वतःचे फायदयासाठी मिलन डे नावाचा मटका जुगार आकडयावर पैसे लावुन खेळत व खेळवित असतांना ८,५६०/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/शिवप्रकाश प्रभाकर मुळे, ने. पो. अ. विशेष पथक नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. इतवारा** गुरन. २०८/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/११३३ पेदे, मो.क्र. ०२४६२२३६५१०** हे करीत आहेत.

## ७) तिर्रट नावाचा जुगार :-

**बिलोली :-** दिनांक ०६.०७.२०१८ रोजी चे १५.३० वा. चे सुमारास राजाराम चौधरी यांचे घराचे जवळ मोकळया जागेत फुलारी गल्ली बिलोली जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह १५३०/- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोउपनि/विजय लिंगुराम पंतोजी, ने. पो.स्टे. बिलोली** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. बिलोली** गुरन. १७१/२०१८ कलम १२(अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/ २३४४ लुंगारे, मो.क्र. ९९२३७३१३४२** हे करीत आहेत.

## ८) बेकायदेशिररित्या देशी दारु बाळगुन मिळुन आला :-

**कंधार :-** दिनांक ०६.०७.२०१८ चे १६.०० वा. चे सुमारास मौजे दिग्रस (बु) ता. कंधार जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे चे १८० एम.एल. च्या ३० शिलबंद बॉटल अंदाजे किंमत १,५६० /- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वैगेरे **फिर्यादी पोहेकॉ/६८१ नारायण शेषेराव कांबळे, पो. स्टे. कंधार** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. कंधार** गुरन १८०/२०१८ कलम ६५ (ई), मुप्रोका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/८६१ कांबळे , मो.क्र. ९६७३९२८८६४** हे करीत आहेत.

## ९) बेकायदेशिररीत्या शिंदी दारू बाळगुन मिळुन आला :-

**वजिराबाद :-** दिनांक ०६.०७.२०१८ रोजी चे १२.४१ वा. चे सुमारास चिखलवाडी नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या शिंदी २५५ लीटर किंमती ५,१००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोना/१७५२ हणमंत रघुनाथ पोतदार, ने. पो. स्टे. वजीराबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. वजिराबाद** गुरन १७२/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/१७५२ मो.क्र. ८३२९८३६१५२** हे करीत आहेत.

## १०) विद्युत शॉक लागुन मृत्यु :-

**अ)भाग्यनगर :-** दिनांक ०६.०७.२०१८ रोजी चे १६.०० वा. चे सुमारास संगमेश्वर नगर जैनमंदीर जवळ उमेश गंजेवार यांचे घरी नांदेड येथे, यातील **मयत नामे रामा विठ्ठलराव कल्याणकर, वय २५ वर्षे तरोडा (खु) नांदेड** हा उमेश गंजेवार यांचे घराचे वास्तुशांती असल्याने घराचे भिंतीवर फोकस लावुन खाली उतरत असताना लाईटचे लोखंडी खांबास हातपाय लागल्याने विद्युत शॉक लागुन बेशुध्द पडल्याने त्यास सरकारी दवाखाना विष्णुपूरी नांदेड येथे विलाज कामी नेले असता मरण पावला. वगैरे **खबर देणार गंगाधर चांदु कल्याणकर, वय १९ वर्षे व्यवसाय पानपट्टी चालक रा. तरोडा (खु) नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** आ.म्र. २३/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोना/२२५९ श्रीरामे , मो.क्र. ०२४६२-२६१३६३** हे करीत आहेत.

**ब)विमानतळ :-** दिनांक ०६.०७.२०१८ रोजी चे १२.३० वा. चे सुमारास नंदीग्राम सोसायटी शारदानगर नांदेड येथे, यातील **मयत नामे दिगांबर भिमाजी गायकवाड, वय ६५ वर्षे व्यवसाय मंजुरी रा. गोकुळनगर नांदेड** हा मिस्त्री काम करीत असतांना ड्रील मशीनचे विद्युत वायर बाजुला करीत असतांना त्याचे हातास विद्युत शॉक लागुन मरण पावला. वगैरे **खबर देणार सुशिल दिगांबर गायकवाड, वय ३७ वर्षे व्यवसाय मजुरी गोकुळ नगर नांदेड.** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. विमानतळ** आ.म्र. २३/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोना/०४ फारुखी , मो.क्र. ०२४६२-२२११००** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.